साक्षीदार क्र.१ शोएब नूर सय्यद यांचा पुढील सरतपास शपथेवर सुरु.

७. मी दाखल केलेल्या अर्जासोबत तपासीक अधिकारी, गांधी चौक पोलीस स्टेशन, लातूर यांनी मोटार अपघात प्राधिकरणास पाठविलेल्या कागदपत्रांच्या प्रती दाखल आहेत. ती खालीलप्रमाणे-

(१) एफ.आय.आर. **(नि.३५)**, (२) फॉर्म कॉम्प एए **(नि.३६)**, (३) दोषारोपपत्र **(नि.३७)**, (४) घटनास्थळ पंचानामा **(नि.३८).**

८. निशाणी क्र.३२ सोबत शॉप अॅक्ट लायसन्स आणि किक बॉक्सींग या क्रिडाप्रकारासंदर्भात मी प्राप्त केलेल्या विविध प्रमाणपत्रांच्या प्रती दाखल केल्या आहेत. मूळ प्रमाणपत्रे आज सोबत आणली आहेत. ती एकत्रीतरित्या **निशाणी क्र.३९** वर आहेत. या शिवाय मी अपघाताच्या संदर्भात सीसीटीव्ही फूटेज दाखल केले आहे.

**उलट-तपासणीः श्री. वाय.व्ही. कुलकर्णी, वकील गैरअर्जदार क्र.१व२ तर्फे.**

९. पुकारले असता गैरहजर. म्हणून, उलट-तपासणी नाही.

**उलट-तपासणीः श्री. एस.एस. शिवपूरकर, वकील गैरअर्जदार क्र.३ तर्फे.**

१०. ज्या मोटारसायकलवर मी चाललो होतो ती माझ्या मित्राची होती. त्याचा क्र.एमएच-२४/एस-६८७१ असा होता. मोटारसायकल मी स्वतः चालवित होतो. माझ्याकडे त्यावेळी मोटारसायकल चालविण्याचा परवाना होता. तो परवाना लातूर येथील उप-प्रादेशिक परिवहन कार्यालयातून काढला होता. मी डूप्लीकेट परवाना काढण्याचा नंतर प्रयत्न केला होता, परंतु माझ्याकडे परवाना क्रमांक नसल्याने तो काढता आला नाही. त्या परवानाची प्रत अथवा फोटो मी काढून ठेवला नव्हता. हे खरे नाही की, माझ्याकडे परवाना नव्हता, त्यामुळे परवाना हरवला असे मी खोटे

सांगत आहे. नाव आणि परवाना काढल्याचे वर्ष यावरून ऑनलाईन परवाना काढण्याचा प्रयत्न मी केला होता, परंतु तो निघाला नाही.

११. अपघातात सामील असलेली कार आय-२० होती. अंदाजे त्या कारचा रंग सिल्व्हर होता. कारची नंबरप्लेट पांढ-या रंगाची होती. मोटारसायकल आणि कार यामध्ये २०-३० फूट अंतर होते. मी चालवत असलेल्या मोटारसायकलची स्पीड त्यावेळी २० ते ३० कि.मी. प्रति तास होती. कारच्या चालकाने ब्रेक लावून गाडी थांबवल्याचे माझ्या लक्षात आले नाही.

प्रश्न - कार थांबल्यानंतर तुम्ही तुमची मोटारसाायकल थांबवू शकला नाहीत?

उत्तर - मी कंट्रोल करु शकलो नाही आणि स्वतःहून सांगतो की, अचानक कार थांबली आणि दरवाजा उघडल्याने थांबवू शकलो नाही.

१२. हे खरे आहे की, अचानक ब्रेक दाबला तर मोटारसायकल थांबते. ( साक्षीदार नमूद करीत आहे की, त्यांना प्रश्न समजला नाही, परत विचारा. ) हे खरे नाही की, माझ्या मोटारसायकलचा स्पीड २० ते ३० कि.मी. प्रति तास होता त्यामुळे अचानक दरवाजा उघडला किंवा कार थांबली आणि मी ब्रेक दाबला तर मोटारसायकल थांबली असती. हे खरे नाही की, माझी मोटारसायकल अती वेगात होती आणि माझ्या चुकीमुळे तो अपघात झाला.

१३. हे खरे आहे की, अपघात घडल्यानंतर ३ आठवड्यानंतर मी फिर्याद दाखल केली. अपघातानंतर मला प्रथम अल-सफा हॉस्पीटलमध्ये नेण्यात आले. मी त्या हॉस्पीटलमध्ये अपघाताच्या दिवशी संध्याकाळपर्यंत होतो. माझी ऐपत नव्हती, त्यामुळे मी त्या दिवशी हॉस्पीटलमध्ये अॅडमीट झालो नाही. हे खरे आहे की, अपघात घडलेल्या दिवशी अल-सफा हॉस्पीटलनंतर मी दुस-या कुठल्या हॉस्पीटलमध्ये अॅडमीट नव्हतो.

१४. मला दोन लहान भाऊ असून, त्यावेळी दोन्ही भाऊ १० वीत होते, त्यापैकी एक भाऊ रिपीट करीत होता. त्यावेळी माझे वडील हयात नव्हते आणि चुलतेही नाहीत. अपघातानंतर नातेवाईक मला भेटण्यासाठी आले नव्हते.

१५. हे खरे नाही की, मी अपघात झाल्यानंतर कारचा खोटा नंबर दिला. हे खरे नाही की, सीसीटीव्ही फुटेज छेडछाड करुन तयार करण्यात आले आहे. हे खरे नाही की, विमा कंपनीविरुध्द नुकसानभरपाई मिळावी यासाठी खोटा गुन्हा दाखल करण्यात आला. हे खरे नाही की, कार थांबली आणि कारचा दरवाजा अचानक उघडण्यात आला, त्यामुळे अपघात झाल्याचे मी खोटे सांगितले.

१६. हे खरे आहे की, निशाणी क्र.३९ वर दाखल करण्यात आलेले शॉप अॅक्ट अॅप्लीकेशन असून, लायसन्स नाही. ते मी दाखल करु शकतो. शॉप अॅक्ट लायसन्स मिळणेसाठी ऑनलाईन फॉर्म दाखल केल्याची तारीख मला आठवत नाही. हे खरे नाही की, ऑनलाईन फॉर्म अपघातानंतर दाखल केला. हे खरे नाही की, नुकसानभरपाई मिळणेसाठी अपघातानंतर तो फॉर्म दाखल करण्यात आला.

१७. हे खरे नाही की, माझे वार्षीक उत्पन्न रु.४,७२,५३०/- इतके नव्हते. हे खरे आहे की, किक बॉक्सींग स्पर्धेमध्ये सहभाग घेतल्यासंदर्भात मी प्रमाणपत्र दाखल केले आहे. ब-याचशा प्रमाणपत्रात मी रेफरी म्हणून काम केल्याचे दिसून येते. हे खरे नाही की, जो काही मार लागला होता, तो आता दुरुस्त झाला आहे. हे खरे नाही की, मला कोणत्याही प्रकारचे अपंगत्व आले नाही. हे खरे नाही की, मागील अर्धा तासापासून कुठल्याही आधाराशिवाय मी उभा आहे. अल-सफा हॉस्पीटलमधील डॉ. मन्सूर भोजगे यांनी माझ्यावर सुरुवातीला उपचार केले. मी त्यांच्याकडे अपंगत्वाचे

प्रमाणपत्र घेण्यासाठी गेलो नव्हतो. हे खरे नाही की, कोणतेही अपंगत्व मला आले नसल्याने प्रमाणपत्र देत नाही असे त्यांनी सांगितले. हे खरे नाही की, त्यामुळे मी दुस-या डॉक्टरांचे खोटे प्रमाणपत्र दाखल केले. हे खरे नाही की, माझे दुकान अजूनही चालू आहे. दुकान बंद केल्यासंदर्भात परवाना देणा-या अधिका-यांना माहीती दिली नाही. हे खरे नाही की, मी खोटे शपथपत्र दिले आणि खोटी साक्ष दिली.

**फेर-तपासः नाही.** **श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत**

Digitally signed by SANJAYKUMAR VIJAYKUMAR JADHAV
Date: 2025.06.25 18:00:47 +0530

**( एस. व्ही. जाधव )**
**दिनांकः २५.०६.२०२५.** **जिल्हा न्यायाधीश-४ तथा**
**सदस्य, मो.अ.दा.प्रा.लातूर.**

---